तरुण भारत

सातारा

www.tarunbharat.com

✦ ₹ ५.०० सोमवार दि. १७ डिसेंबर २०१८ बेळगाव • गोवा •


D.P. ... KOREGA...

डी. पी. भोसले ग्रंथालय कोरेगाव

# भोसले कॉलेजमध्ये विजय दिन समारंभ उत्साहात

## शहीद जवानांच्या कुटुंबियांचा मान्यवरांकडून सत्कार, दख्खनचा राजा मर्दानी खेळ पथकाच्या चित्तथरारक कसरती

वार्ताहर
कोरेगाव

सैनिकी सेवा ही उत्तम सेवा आहे. जिद्द, चिकाटी व प्रयत्नांच्या जोरावर अपेक्षित यश संपादन करता येते. आयुष्यामध्ये यश मिळवायचे असेल तर कष्ट महत्वाचे आहेत. देश व समाजाच्या उन्नतीसाठी विद्यार्थ्यांनी सैनिकी सेवेत सहभागी व्हावे. सातारा जिल्हा हा वीर जवानांचा व क्रांतीकारकांचा आहे, असे प्रतिपादन कर्नल शिवाजीराव घाडगे यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेच्या डी. पी. भोसले महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठ शहीद स्फुर्ती केंद्र, २२ महाराष्ट्र बटालियन, एनसीसी कार्यालय, सातारा, सातारा जिल्हा सैनिक कल्याण मंडळ, विजय दिवस समारोह समिती, कोरेगाव, एक्स डीपीएन्स असोसिएशन व डी. पी. भोसले कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या विजय दिवस समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून १७ मराठा लाईट इन्फंट्रीचे कमांडिंग ऑफीसर कर्नल शिवाजीराव घाडगे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेचे सचिव प्रिं. डॉ. भाऊसाहेब कराळे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत रयत शिक्षण संस्थेचे सहसचिव प्रिं. डॉ. विजयसिंह सावंत यांनी केले. यावेळी शहीद जवानांच्या कुटुंबियांचा सत्कार व शौर्य पदक विजेते सुभेदार दत्तात्रय घाडगे यांचा विशेष गौरव उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

या कार्यक्रमास मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.




**कोरेगावः आयोजित केलेल्या विजय दिवस समारंभानिमित्ताने शहीदांना अभिवादन करताना कर्नल शिवाजीराव घाडगे, डॉ. कराळे व इतर.**

### शहिदांनी बलिदानातून देशाची जडण-घडणः डॉ. कराळे

शहिदांनी दिलेल्या बलिदानातून देशाची जडण-घडण झाली आहे. त्यांच्या बलिदानाची जाणीव ठेवून आजच्या युवकांनी देशसेवेमध्ये सहभागी व्हावे. प्रत्येकाच्या मनामनामध्ये देशप्रेम असावे. देश सेवेमध्ये शहिदांच्या कुटुंबियांनी देखील दिलेले योगदान विसरता येणार नाही. यानिमित्ताने दख्खनचा राजा मर्दानी खेळ पथकाने प्रात्यक्षिकांचे सादरीकरण केले.